## प्रथम, द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सूचना २०२२-२३

**मा. विद्या परिषद ठराव क्र. वि.प. ए-५८/२०१४, दि. ०९/०४/२०१४, रोजीच्या तसेच वि.प. ए-३२/२०१८, दि. २९/०५/२०१८ रोजी झालेल्या निर्णयानुसार विभागप्रवेश ते पदवी प्रदान पर्यंतची नियमावली**

**प्रवेश सुरुवात-०१/०८/२०२२**

## सूचना २०२२-२३

पदवी व पदव्युत्तर **शिक्षणक्रमांना** प्रवेश घेणाऱ्या अध्ययनार्थीनी (विद्यार्थ्यांनी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजूस असलेल्या Quick Link अंतर्गत DEEL (External Mode) लिंकवर जाऊन Admission २०२२-२३ लिंक वर Click करावे .

१. सोबत जोडलेली माहिती काळजीपूर्वक वाचुन मगच प्रवेश ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात करावी. अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज स्वीकारला जाणार नाही.

२. प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या ज्या अध्ययनार्थ्यांचा (विद्यार्थ्यांचा) ऑनलाईन प्रवेश अर्जावर जर PRN असेल तर त्या विद्यार्थ्यांनी सदर PRN चा उल्लेख असलेल्या महाविद्यालयाचा ऑनलाईन टि.सी प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३. द्वितीय वर्षास ONLINE प्रवेशावेळी आपला जो PRN क्रमांक यापूर्वी प्रथम वर्षास मिळाला आहे तो टाकून प्रक्रिया करावी.

४. फोटो / सही अपलोड करायची राहिली असल्यास ती प्रक्रिया पूर्ण करावी.

५. सोबत दिलेल्या चलनामध्ये हाताने माहिती भरुन दिलेले चलन भरावे.

६. द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या अध्ययनार्थ्यांनी (विद्यार्थ्यांनी) प्रवेश अर्जासोबत डील विभागाद्वारे प्राप्त मुळ गुणपत्रकाची झेरॉक्स साक्षांकीत प्रत जोडावी. कृपया Online गुणपत्रिकेची झेरॉक्स जोडू नये. जर आपण गुणपत्रक घेतले नसेल तर संबंधित केंद्रावर किंवा डील विभागात **फोन नं. ०२५७-२२५७४९५/२२५८४९६** वर संपर्क साधावा.

७. अध्ययन साहित्य हे SOFT COPY तसेच Print स्वरुपात कसे उपलब्ध होणार आहे. याबाबतच्या सूचना Self Learning Material (SLM) अंतर्गत स्वंतत्रपणे देण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.

### १. प्रवेश पात्रता व शिक्षणक्रम प्रक्रियांबाबत नियमावली:-

१ राष्ट्रीय व राज्यस्तरावरील मुक्त विद्यापीठांच्या अध्ययनार्थीना (विद्यार्थी) स्थानांतरण प्रमाणपत्र (टी. सी.) विद्यापीठाकडून दिला जात नाही. म्हणून डील अंतर्गत प्रवेशसाठी इच्छूक अध्ययनार्थ्यांकडे त्या पूर्वी जी पदवी

प्राप्त केली असेल, त्या पदवीच्या संदर्भात मूळ स्थानांतरण प्रमाणपत्र (ओरीजनल टी.सी. / एल.सी.) तसेच विद्यापीठाचे मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (ओरीजनल मायग्रेशन सर्टिफिकेट) अध्ययनार्थ्यांने प्रवेश घेतेवेळी जमा करणे अनिवार्य आहे.

२ एका विषयात पदवी पूर्ण केली आहे व दुसऱ्या विषयामध्ये पदवी करायची असेल तर सरळ द्वितीय वर्षाला प्रवेश दिला जाणार नाही.

३ इतर कोणत्याही नियमित विद्यापीठातून नियमित प्रवेशाद्वारे प्रथम वर्ष कला (एफ.वाय.बी.ए.) / एम.ए. प्रथम वर्ष पूर्ण केले असेल, तर डिल विभागा अंतर्गत बी.ए. / एम.ए. च्या शिक्षणक्रमांच्या द्वितीय वर्षाला प्रवेश दिला जाणार नाही.

४ ज्या अध्यनार्थीचे (विद्यार्थी) कागदपत्रे अपूर्ण असतील, त्या अध्यनार्थ्यांकडून किमान एक महिन्याच्या आत कागदपत्रे जमा करण्याच्या अटीवर प्रवेश अर्ज स्विकारण्यात येईल. त्या संदर्भातील अर्ज विद्यार्थ्याने डील विभागाकडे देणे अनिवार्य राहील.

५ अध्ययनार्थ्याकडे (विद्यार्थी) मूळ स्थानांतरण प्रमाणपत्र (टी.सी.) नसेल किंवा हरवले असेल, अशा काही अपवादात्मक वेळी दुय्यम स्थानांतरण प्रमाणपत्र (डुप्लीकेट टी.सी.) सादर करता येईल. मात्र त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने सादर करता येईल. याबाबतची खोटी माहिती आढळल्यास अध्ययनार्थीच(विद्यार्थी) त्यास जबाबदार राहील.

६ एकदा प्रवेश घेतला तर, कोणत्याही सबबीवर प्रवेश रद्द केला जाणार नाही व अध्ययनार्थीस (विद्यार्थी)शुल्कही परत केले जाणार नाही.

७ विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेश कालावधीत जे शुल्क निर्धारित केलेले असेल, ते भरणे अनिवार्य आहे. निर्धारित मुदतीनंतर शुल्काचे चलन भरले तर कोणत्याही सबबीवर ते शुल्क परत मिळणार नाही .

८ प्रवेश शुल्क भरतांना चुकुन दुसऱ्या शिक्षणक्रमांच्या प्रवेश शुल्काचे चलन भरले तर कोणत्याही सबबीवर ते शुल्क परत मिळणार नाही व दुसऱ्या शिक्षणक्रमांसाठी जर समान शुल्क असेल तरच वर्ग केले जातील . जर दुसऱ्या शिक्षणक्रमांसाठी समान शुल्क नसेल तर कोणत्याही सबबीवर शुल्क वर्ग केले जाणार नाही. नव्याने शुल्क भरुन शिक्षणक्रमास प्रवेश घ्यावा लागेल.

९ ज्या शिक्षणक्रमांना अंतर्गत कार्यात (Internal Work) जसे स्वाध्याय (Assignments), शोध निबंध अहवाल (Dissertation), परिसंवाद (Seminar), मौखिक परीक्षा (Viva - voce) अनुषंगिक कार्य असेल ते वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे .

१० कोणत्याही अध्ययनार्थ्यांस(विद्यार्थी) वैयक्तिक रित्या अध्ययन साहित्य (Study Material) पाठविले जाणार नाही.

११ पदव्युत्तर शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यापासून किमान दोन (२) वर्षे व जास्तीत जास्त चार (४) वर्षांमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. काही कारणास्तव प्रथम वर्षांची परीक्षा देऊ शकले नाहीत, तरी द्वितीय वर्षास प्रवेश घेण्यास अध्ययनार्थी (विद्यार्थी)पात्र असेल. जर चार (४) वर्षात पदव्युत्तर शिक्षणक्रम पूर्ण झाला नाही तर विद्यापीठ नियमानुसार शुल्क (Fee) भरुन पुढील परीक्षेच्या संधी दिल्या जातील. मात्र परीक्षेचे शुल्क हे पूनर्परीक्षार्थी (Repeater) अध्ययनार्थ्यांना जे लागू राहील त्याप्रमाणे विद्यापीठ नियमानुसार अतिरिक्त शुल्क भरुन परीक्षा देता येईल. विद्यापीठ नियमानुसार अतिरिक्त संधीत आपण शिक्षणक्रम पूर्ण करू शकला नाही, तर नव्याने प्रथम वर्षापासून प्रवेश घ्यावा लागेल.

१२ डील विभागाच्या शिक्षणक्रम अंमलबजावणी अंतर्गत होणाऱ्या विविध प्रक्रियांबाबतचे निर्णय, वेळोवेळी होणारे बदल यांबाबतचे सर्वाधिकार डील विभागास राहातील. प्रवेश पात्रता व शिक्षणक्रम अंमलबजावणी प्रक्रियेबाबत होणारे बदल स्वीकारणे अध्ययनार्थ्यांना (विद्यार्थी) बंधनकारक राहिल.

❖ **अत्यंत महत्वाचे :-** अध्ययनार्थीने (Student) आपला ऑनलाईन प्रवेशावेळी दिलेला ईमेल व पासवर्ड, भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) निकाल हातात येईपर्यंत काळजीपूर्वक जपून ठेवणे अनिवार्य राहिल. अन्यथा डील विभागाकडून प्रवेश ते अंतिम निकालप्रक्रिये दरम्यान होणाऱ्या अंमलबजावणींची माहिती किंवा संदर्भिय बदल याबाबत वेळोवेळी पाठविले जाणारे संदेश (SMS) सुविधेचा लाभ अध्ययनार्थींना घेता येणार नाही. व काही शैक्षणिक नुकसान झाल्यास अध्ययनार्थी त्यास स्वत: जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी.
**(टीप :- ईमेल व भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) हयांत बदल असल्यास त्वरीत डील विभागाशी ०२५७ - २२५७४९५/२२५८४९६ या दूरध्वनीवर किंवा प्रत्यक्ष येवून बदल करून घ्यावा.)**

## ▪ संपर्कासाठी पत्ता व फोन नं. :

**बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग**
**Department of External Education and Learning (DEEL),**
**डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम विद्यार्थी भवन, पहिला मजला, रूम नं - २०४/०५,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

**कार्यालय फोन नं - 0257-2257495/2258496**

**E-mail :** ideal@nmu.ac.in,
**Facebook ID : DEEL,Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon.**

**संकेत स्थळ (Website):** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजूस असलेल्या Quick Link अंतर्गत DEEL (External Mode) लिंक.

**मा. संचालक,**
**बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग**